# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- द्रद्धःद्र.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २३-२३** **दिनांक २४/०१/२०२३**

## सायबर गुन्हयांमध्ये सन २०२२ मध्ये पिडीतांची फसवणुक झालेली तब्बल ९१,९४,८३३/- रुपये परत - सायबर गुन्हे कक्षाची कामगिरी.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत सायबर विषयक तक्रारींची चौकशी व सायबर गुन्ह्यांच्या तपासाकरीता गुन्हे शाखेअंतर्गत सायबर गुन्हे कक्ष कार्यरत आहे. आयुक्तालयातील फसवणूक झालेल्या नागरिकांच्या ऑनलाईन फसवणूक तक्रारीसंदर्भात अर्ज प्राप्त होतात. सन २०२१ व सन २०२२ मध्ये सायबर गुन्हे कक्ष येथे खालीलप्रमाणे तक्रारी अर्ज प्राप्त झालेले होते.

| सन २०२१ | सन २०२२ |
|---|---|
| ७९४ | २७३८ |

**सायबर फसवणूकीच्या तक्रारींमध्ये मुख्यत: खालील फसवणुकींचा समावेश आहे.**

- Debit / Credit Card Fraud - OTP Sharing
- E-Wallet Related Fraud - (OLX, Paytm, Amazon etc.) (**QR Code Scanning for Payments.**)
- Reward Points, Gift Voucher, Lottery,
- Online Job Fraud – Work from Home Task
- Crypto currency Frauds
- Online Lone app Fraud Loan App Installing & Giving all Access Permission (**Contact, Media, Location etc….)**
- Electricity Bill update
- Sextortion Facebook, What’s app or other Social Media Video Call & Asking Money (**For Not Sharing Video on Social Sites or Contacts...**.)
- Sim Card, Bank Account (KYC Update), 4G To 5G Switch
- Fake Customer Care Number Searching From Google.,

सायबर गुन्हे कक्ष येथे सामान्य नागरिकांचे ऑनलाईन फसवणुकीची तक्रार प्राप्त होताच तात्काळ ( GOLDEN HOURS ) मध्ये ज्या बँक/वॉलेट मध्ये रक्कम गेली असेल त्याबाबत सायबर गुन्हे कक्षाचे पोलीस अधिकारी/पोलीस अंमलदार यांनी अहोरात्र अथक प्रयत्नांनी सदर रक्कमेबाबत पत्रव्यवहार व वेळोवेळी पाठपुराव्याच्या आधारे सायबर फसवणूकीच्या अर्ज चौकशीमध्ये तक्रारदार यांना कोणत्याही न्यायालयीन प्रक्रियेविना सन २०२१ व सन २०२२ मध्ये रक्कम परत मिळवून देण्यात यश आलेले आहे.

| सन २०२१ | सन २०२२ |
|---|---|
| २८,८०,९६९/- | ९१,९४,८३३/- |

सन २०२२ मध्ये एकूण २७ प्रकरणांमध्ये आरोपी शोधून त्यांना ताब्यात घेवून पोलीस ठाणे येथे नोंद असलेले सायबर फसवणूकीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत.

सन २०२२ मध्ये सायबर गुन्हे कक्षाकडून आयुक्तालयातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेकरीता सायबर तपासाबाबत २२ प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आलेले आहे. तसेच सायबर गुन्हे फसवणूकीच्या प्रकारांबाबत माहिती देण्याकरीता १२ विविध ठिकाणी जनजागृतीचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

सायबर गुन्हे कक्षाकडून सायबर तक्रारींमध्ये होणाऱ्या नागरिकांच्या फसवणूकीस आळा घालण्यासाठी व सायबर फसवणूकीबाबत जनजागृती निर्माण होण्याकरीता स्वतंत्र सेल्फी स्टँड ची उभारणी करण्यात आलेली आहे.

- **सायबर गुन्हे कक्ष येथे प्राप्त होणाऱ्या सायबर विषयक तक्रारींमध्ये तक्रारदार हे उच्चशिक्षीत, उच्च पदस्थ, व्यवसायिक डॉक्टर,वकील,बँक अधिकारी व तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये काम करणारे असून त्यांची योग्य माहितीच्या अभावामुळे व निष्काळजीपणामूळे फसवणूक झाल्याचे निदर्शनास आलेले आहे.**
- **फसवणूक केलेली रक्कमेमध्ये किमान २९९/- रुपये तसेच कमाल ७,००,०००/- रुपयाची फसवणूक रक्कम परत देण्यात आली आहे.**
- **सायबर गुन्हे कक्ष येथे प्राप्त तक्रारी अर्जामधील फसवणूक रक्कम थेट नागरीकांच्या बँक खाते/वॉलेट/डिमॅट अकाऊंटमध्ये कोणत्याही न्यायालयीन प्रक्रीयेविना परत करण्यात आली आहे.**

**मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, सायबर फसवणूकीचा प्रकार आपल्यासोबत घडल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर तक्रार द्यावी.**

**सदरची कामगिरी तत्कालिन पोलीस उप आयुक्त (गुन्हे), डॉ. श्री. महेश पाटील, श्री. अविनाश अंबूरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली सायबर गुन्हे कक्षाचे पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, स.पो.नि. स्वप्नील वाव्हळ, पो.उप.निरी प्रसाद शेनोळकर, म.पो.हवा. १२००७ माधूरी धिंडे, पो.अंम प्रविण आव्हाड, गणेश इलग, म.पो.अं. पल्लवी निकम, सुवर्णा माळी, अमिना पठाण यांनी पार पाडली आहे.**

- सायबर गुन्हे शाखा संपर्क क्रमांक :- ०२२-२८११ ०१३५
- सायबर गुन्हे शाखा व्हॉट्सअॅप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५
- सायबर गुन्हे शाखा ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

-----oooo----